मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | » पुणे, पिंपरी-चिंचवड | » शनिवार, दि. 29 मार्च 2025 | पान- 1

# पिंपरी-चिंचवड शहर ‘अर्बन फॉरेस्ट’ बनविणार

## दुर्गा टेकडीचा पुनर्विकास करणार : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची ग्वाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

‘दुर्गा टेकडीचा पुनर्विकास करताना निसर्गाचे संवर्धन करण्यास महत्त्व दिले जाणार आहे. या विकास कामाच्या अनुषंगाने नागरिकांना सूचना देता याव्यात, दुर्गा टेकडीच्या विकासात नागरिकांना अपेक्षित असणाऱ्या गोष्टींवर सविस्तर चर्चा व्हावी, यासाठी आयोजित दुर्गा टेकडी उद्यान डिझाईन विचारसरणी कार्यशाळेत आलेल्या नागरिकांच्या सूचनांचा विचार करून दुर्गा टेकडीचा पुनर्विकास करण्याची’ ग्वाही महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. पिंपरी-चिंचवड शहर वनीकरण (अर्बन फॉरेस्ट) बनविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

‘अ’ प्रभागातील निगडीतील दुर्गा टेकडीचा पुनर्विकास करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. या अनुषंगाने नागरिकांशी चर्चा करण्यासाठी दुर्गा टेकडी येथे ‘दुर्गा टेकडी उद्यान डिझाईन’ विचारसरणी कार्यशाळा’ आयोजित करण्यात आली होती. यावेळी आयुक्त सिंह बोलत होते. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे- पाटील, कार्यकारी अभियंता विजय भोजने, सहायक आयुक्त उमेश ढाकणे, उप अभियंता निखिल फेंडर, कनिष्ठ अभियंता संदीप ठोकळे, अनिल झोडे, उद्यान निरीक्षक अशोक वायकर यांच्यासह नागरिक उपस्थित होते.



‘दुर्गा टेकडीचा पुनर्विकास करण्याचे नियोजित आहे. त्यासाठी सर्वांसोबत चर्चा केली जात आहे. कार्यशाळेत आलेल्या सूचनांचा विचार केला जाईल. येथील निसर्ग जपत विकास करण्यास प्राधान्य दिले जाईल. पिंपरी-चिंचवड शहर वनीकरण (अर्बन फॉरेस्ट) बनवण्याचा उपक्रम महापालिकेने हाती घेतला आहे. नुकतेच तळवडे येथे उद्यान उभारले आहे. शहरात आणखी तीन ठिकाणी मोठे वन उद्यान बनवण्याचे नियोजन आहे,’ असल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले.

कार्यशाळेत सहभागी झालेल्या नागरिकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना आयुक्तांनी सविस्तर उत्तरे दिली. या चर्चेमध्ये वास्तूविशारद राहुल कादरी, वाईड अँगल फोरमच्या प्रिया गोखले, पर्यावरण शिक्षण विभागाच्या संस्कृती मेनन, सतीश आवटे, वीर मास्टर यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्था व संघटनांचे प्रतिनिधी, पर्यावरण प्रेमी नागरिक आदींनी सहभाग घेतला. कार्यशाळेनंतर दुर्गा टेकडी येथील वाहनतळ, डॉल्फिन पार्कची पाहणी सिंह यांनी केली.

### पिंपरी-चिंचवड शहरात 32 लाख वृक्ष

» शहरात लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची माहिती मिळावी यासाठी भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे (जीआयएस टॅगिंग) करून वृक्षांची गणना करण्यात आली आहे. या गणनेत शहरात ३२ लाख १६ हजार ७९९ वृक्ष असल्याचे दिसून आल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

---

# टेल्को रस्त्याच्या सवा किलोमीटर भागाचे अद्ययावतीकरण

## कामासाठी 81 कोटी 77 लाख 55 हजार 556 रुपये खर्च करण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

टेल्को रस्त्यावरील, भोसरीतील गवळी माथा ते इंद्रायणी चौकापर्यंतचा सव्वा किलोमीटरचा मार्ग अद्ययावत पद्धतीने विकसित करण्यात येणार आहे. त्यामध्ये दोन्ही बाजूंनी मार्गिका, वाहनतळ, सायकल मार्ग, हरितपट्टा, सेवावाहिन्या, पदपथ, व्यायामशाळा, शौचालय उभारण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका कर्ज काढून हे काम करणार असून, या कामासाठी ८१ कोटी ७७ लाख ५५ हजार ५५६ रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

शहरातील टेल्को रस्ता हा मुख्य रस्त्यांपैकी एक महत्त्वाचा रस्ता आहे. दुर्गा चौकापासून इंद्रायणीनगरपर्यंत हा रस्ता साडेआठ किलोमीटर अंतराचा आहे. त्यांपैकी गवळी माथा ते इंद्रायणीनगर या सव्वा किलोमीटर अंतराच्या रस्त्याचा आधुनिक पद्धतीने विकास करण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेने प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून मॅप्स ग्लोबल सिव्हिलटेक प्रा. लि. यांची नियुक्ती केली. रस्त्याचे आवश्यक सर्वेक्षण आणि नकाशे तयार केले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, सद्य:स्थितीतील सहा पदरी रस्ता अपुरा पडत असल्याने वाहतूककोंडी होत असल्याचे सर्वेक्षणात दिसून आले. त्यासाठी हा सव्वा किलोमीटर अंतराचा रस्ता विकसित करण्याचे नियोजन केले गेले. त्यानुसार, ९० कोटी ६५ लाख ७७ हजार ४५५ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली गेली. यामध्ये केवळ दोन ठेकेदारांनी भाग घेतला. दोन वेळा निविदेला मुदतवाढ दिल्यानंतरही दोनच ठेकेदारांनी या कामासाठी निविदा भरली. त्यानंतर महापालिकेने ११ टक्के कमी दराची निविदा स्वीकारली. त्यांच्याकडून ८१ कोटी ७७ लाख ५५ हजार ५५६ रुपयांमध्ये काम करून घेण्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. या कामाची मुदत ३६ महिन्यांची आहे.



टेल्को रस्त्यावरील गवळीमाथा ते इंद्रायणीनगर चौकापर्यंतचा सव्वा किलोमीटर रस्ता विकसित करण्यात येणार आहे. त्यामध्ये स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनि:सारण आणि विद्युत अशी कामे केली जाणार आहेत. रस्त्याचे काम झाल्यानंतर वाहतूककोंडी सुटण्यास मदत होईल, असा दावा महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी केला.

### रस्त्याच्या दोन्ही बाजूला मार्गिका

» महापालिकेच्या नियोजनानुसार, सव्वा किलोमीटर अंतराच्या दोन्ही बाजूंना एकेक मार्गिका करण्यात येणार आहे. त्यामुळे रस्ता आठपदरी होणार आहे. डांबरीकरणाच्या थराने मुख्य रस्त्याचे मजबुतीकरण केले जाणार आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस ९०० मिलिमीटर व्यासाची पावसाळी वाहिनी टाकण्यात येणार आहे. नवीन उंच दुभाजक आणि आवश्यक ठिकाणी सेवा रस्ता विकसित करण्यात येणार आहे.

# एकात्मिक वाहतूक आराखडा मंजुरीच्या अंतिम टप्प्यात

## शहरातील एकात्मिक वाहतूक आराखडा मंजुरीच्या टप्प्यात : मंजुरीनंतर लवकरच कार्यवाहीला सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील एकात्मिक वाहतूक आराखडा मंजुरीच्या टप्प्यात आहे. मंजुरीनंतर लवकरच कार्यवाहीला सुरुवात होईल. पुणे बाह्यवळण मार्गालाही गती देण्यात आली असून, येत्या दोन वर्षांत हा मार्ग पूर्ण होण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू असल्याची माहिती विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिली. वाहतुकीच्या अनुषंगाने अल्पकालीन, दीर्घकालीन उपाययोजनांना लागणारा आवश्यक वेळ पाहता तत्काळ करण्यासारख्या उपाययोजना हाती घेऊन उद्योगांना वाहतूक कोंडीपासून दिलासा द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.



उद्योजकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांची बैठक चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरच्या सभागृहात झाली. पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी चिंचवड शहराचे अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी, एमसीसीआयएचे महासंचालक प्रशांत गिरबने या वेळी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, 'राज्यात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित करण्याच्या दृष्टीने उद्योगांना सहकार्य, सुविधा देण्यास प्राधान्य आहे. या बैठकीत उद्योजकांनी मांडलेल्या समस्या, अडचणी जाणून घेण्यासाठी दर दोन महिन्याला बैठक घेतली जात आहे. संबंधित विभागांनी पुढील बैठकीपूर्वी त्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे. उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध प्रशासकीय विभागांनी सामूहिक दृष्टिकोन ठेऊन एकत्रित प्रयत्न करावेत. राज्यात उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्याचे राज्य शासनाचे धोरण असून, जिल्ह्यामध्ये विविध क्षेत्रांतील उद्योग येण्यासाठी प्रशासनातर्फे प्रयत्न केले जातील.'

### उपद्रव करणाऱ्यांवर कठोर कारवाई

» 'उद्योजकांना कोणत्याही घटकाकडून त्रास देण्याचा प्रयत्न होत असल्यास पोलिसांकडून उपद्रव देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे,' असे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी सांगितले.

'टुलिंग उद्योग विखुरलेले असल्याने त्यांना सुविधा पुरविण्यात येत असलेल्या समस्या सोडविण्याच्या दृष्टिने जागा, अन्य सुविधा उपलब्ध करून त्यांचा समूह (क्लस्टर) विकसित करण्यासाठी, खासगी उद्योगांच्या समस्या सोडवण्यासाठीही प्रयत्न करण्यात येतील. पुणे-मुंबई हा देशातील सर्वात मोठा औद्योगिक प्रदेश करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. एमआयडीसीने एक खिडकीद्वारे संबंधित विभागांशी समन्वय साधून उद्योजकांच्या समस्या सोडवाव्यात,' अशा सूचना जिल्हाधिकारी डुडी यांनी दिल्या.

'पुण्यात कार्यरत असलेल्या राज्य शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कटिबद्धतेमुळे देशातील आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून गुंतवणूक प्रवाह अधिक तीव्रतेने सुरू राहील. त्यामुळे नवीन रोजगार निर्मिती होण्यासह या भागाचा आर्थिक विकास सुलभ होईल. दर दोन महिन्यांनी होणारी बैठक उद्योग आणि शासन यांच्यातील संवादासाठी महत्त्वाची ठरेल. पुणे विभागात औद्योगिक वाढीस चालना देण्यासाठी एमसीसीआयए राज्य सरकार आणि पुणे जिल्हा प्रशासनाला पूर्ण सहकार्य करेल,' असे गिरबने यांनी नमूद केले.

# अतिरिक्त आयुक्तांची विद्यार्थ्यांसोबत 'परीक्षा पे चर्चा'


## महापालिकेचा क्रीडा प्रबोधनी शाळेत उपक्रम : विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जाताना काय काळजी घ्यावी, करिअरची निवड कशी करावी, अपयश आल्यानंतर खचून न जाता पुन्हा जोमाने प्रयत्न करीत यशाला गवसणी कशी घालावी, याबाबतचे सविस्तर मार्गदर्शन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना करतानाच विद्यार्थ्यांसोबत 'परीक्षा पे चर्चा' केली.

महापालिकेच्या वतीने पिंपरी मधील उद्यमनगर येथील क्रीडा प्रबोधिनी शाळेत आयोजित केलेल्या 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी जांभळे पाटील यांनी व्यासपीठावर न बसता थेट विद्यार्थ्यांसोबत बसून त्यांच्याशी खेळ, अभ्यास, छंद आणि भविष्यातील संधी आदी विषयांवर मनमोकळेपणाने संवाद साधला.

शाळकरी विद्यार्थ्यांचा परीक्षा जवळ आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना तणावमुक्त परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी महानगरपालिकेच्या वतीने क्रीडा प्रबोधिनी शाळेत 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, माध्यमिक शिक्षणाधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापक जयराम वायळ, क्रीडा प्रमुख ऋषिकांत वचकल, शिक्षक सोनाली पाटील, संग्राम मोहिते, राहुल मोरे, अक्षता बांगर, मनोज राऊत, प्रमिला अल्हाट, दत्तात्रय कोळी, दिनेश राऊत, विजय पाटील, प्रियंका पाटील, गौरी गाडेकर यांच्यासह शाळेतील शिक्षक, कर्मचारी वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील म्हणाले, 'आयुष्यात यशस्वी होण्यासाठी लक्ष्य निश्चित करा. आपले क्षेत्र निवडून त्यामध्ये यश मिळवण्यासाठी प्रयत्न करा. आपले पालक आपल्याला सांगत आहेत, केवळ म्हणून अभ्यास न करता मनापासून अभ्यास करा. तुम्हाला यश नक्की मिळेल. तुमच्या आवडत्या क्षेत्रात करिअर करा. विविध खेळांमध्ये सहभागी होऊन क्रीडा क्षेत्रामध्येही तुम्ही चांगले करिअर करू शकता. महानगरपालिका तुम्हाला क्रीडा प्रशिक्षक, क्रीडा साहित्य, मैदान उपलब्ध करून देतच आहे. विद्यार्थ्यांसाठी उत्तम दर्जाच्या खेळाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांनी देखील खेळामध्ये राष्ट्रीय स्तरावर आपल्या शहराला नावलौकिक मिळाले, अशा पद्धतीने क्रीडा क्षेत्रात कामगिरी करावी,' असे आवाहनही त्यांनी केले.

> क्रीडा आणि शिक्षण यांचा समतोल राखत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे हेच आमचे उद्दीष्ट आहे. महानगरपालिकेच्या क्रीडा प्रबोधिनी शाळेच्या माध्यमातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या शहराचे नाव उंचावणारे खेळाडू घडविण्यासाठी येथील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व क्रीडा प्रशिक्षण आणि उत्कृष्ट सुविधा मिळाव्यात यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. आज शाळेतील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधल्यामुळे क्रीडा क्षेत्रात मुलांना यशस्वी होण्यासाठी आणखी कोणत्या सोयीसुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे, हे देखील समजले असून त्यादृष्टीने भविष्यात नियोजन करणे शक्य होणार आहे.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त.**

शाळेचे मुख्याध्यापक जयराम वायळ यांनी यावेळी आतापर्यंत शाळेतील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये केलेल्या कामगिरीची माहिती दिली.

# मिळकतकरवाढीत पिंपरी अव्वल; दहा लाखांचे पारितोषिक

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने मिळकतकर संकलनामध्ये वाढ होण्यासाठी राबविलेल्या विविध उपाययोजनांची राज्य सरकारने दखल घेतली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने मिळकतकर संकलनामध्ये वाढ होण्यासाठी राबविलेल्या विविध उपाययोजनांची राज्य सरकारने दखल घेतली आहे. महापालिकेला राज्य सरकारच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचा पुरस्कार व दहा लाखांचे बक्षीस मिळाले आहे.

मिळकतकर हा महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. करसंकलन करण्यासाठी महापालिकेने विविध उपाययोजना राबविल्या आहेत. विनानोंद, करकक्षेत नसलेल्या मिळकती शोधून करप्रवाहात आणल्या आहेत. मिळकतकर वाढीसाठी ऑनलाइन सुविधा, मिळकत जप्ती, लिलाव प्रक्रिया, मिळकतींचे जिओ सिक्वेन्सिंग, प्रत्येक मिळकतीसाठी विशेष ओळख क्रमांक या उपाययोजना केल्या. त्यामुळे करसंकलन वाढून महापालिकेचे उत्पन्नही वाढले.



### करसंकलनसाठी उपाययोजना

» मालमत्ताधारकांना विविध प्रकारच्या सवलती जाहीर केल्या. पर्यावरणपूरक इमारती, ऑनलाइन स्वरुपात कर भरणा, महिलांच्या नावे मालमत्तांचा समावेश, 'माझी मिळकत माझी आकारणी', 'मालमत्ता कराच्या देयकांची पुनर्रचना', 'मालमत्ता लिलाव प्रक्रिया धोरण', 'भारत बिल पे सिस्टम', डेटा आधारित निर्णय प्रक्रियेच्या माध्यमातून संसाधनांचे योग्य वाटप, मालमत्ताधारकांमध्ये जागरुकता, 'प्रकल्प सिध्दी'उपक्रमाद्वारे महिला बचत गटांच्या महिलांद्वारे देयकांचे वाटप, मोबाइल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून मोबाइल क्रमांक अद्ययावतीकरण, मालमत्तेचे अक्षांश-रेखांश सर्वेक्षणातून माहिती संकलित करून कार्यवाही, मालमत्तांचे सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक मालमत्तेस युपीक-आयडी, जिओ सिक्वेंसिंग, ड्रोन सर्वेक्षणाच्या माध्यमातून मालमत्ता शोधण्यास पुढील काळामध्ये मदत होणार आहे.

याबाबतचा प्रस्ताव महापालिकेने राज्य सरकारच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धेसाठी पाठवला होता. त्यानंतर राज्यस्तरीय निवड समितीकडून या प्रस्तावाची दखल घेऊन मिळकतकरवाढीसाठी केलेल्या उपाययोजनांसाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेला शासनाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार व दहा लाखांचे बक्षीस जाहीर करण्यात आले.

> करसंकलन विभागाने राबवलेल्या उपाययोजनांची दखल घेऊन राज्य सरकारने दिलेला पुरस्कार ही अभिमानाची बाब आहे. आगामी काळात मिळकतकर वसुलीसाठी आणखी व्यापक मोहीम राबवली जाईल,
> - प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

करसंकलन विभागाने राबविलेल्या विविध उपाययोजनांमुळे करसंकलनामध्ये विक्रमी वाढ झाली. सन २०२१-२२ मध्ये ६२८ कोटी, २०२२-२३ मध्ये ८१६ कोटी आणि २०२३-२४ मध्ये ९७७ कोटींची विक्रमी करवसुली झाली. या विभागाचे तत्कालीन सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी करवाढीसाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांच्या कामाची दखल घेऊन शासनाने अधिकारी संवर्गातील दुसऱ्या क्रमांकाचे ३० हजार रुपयांचे पारितोषिक त्यांना जाहीर केले.

'माझी मिळकत माझी आकारणी', 'मालमत्ता कराच्या देयकांची पुनर्रचना', 'मालमत्ता लिलाव प्रक्रिया धोरण', 'भारत बिल पे सिस्टम', डेटा आधारित निर्णय प्रक्रियेच्या माध्यमातून संसाधनांचे योग्य वाटप, मालमत्ताधारकांमध्ये जागरुकता, 'प्रकल्प सिध्दी'उपक्रमाद्वारे महिला बचत गटांच्या महिलांद्वारे देयकांचे वाटप, मोबाइल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून मोबाइल क्रमांक अद्ययावतीकरण, मालमत्तेचे अक्षांश-रेखांश सर्वेक्षणातून माहिती संकलित करून कार्यवाही, मालमत्तांचे सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक मालमत्तेस युपीक-आयडी, जिओ सिक्वेंसिंग, ड्रोन सर्वेक्षणाच्या माध्यमातून मालमत्ता शोधण्यास पुढील काळामध्ये मदत होणार आहे.

# रोजगार हमी योजना समितीच्या प्रमुखपदी आमदार सुनील शेळके

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच इतर वरिष्ठ नेत्यांनी सुनील शेळके यांचे नियुक्तीबद्दल अभिनंदन केले

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळचे आमदार सुनील शेळके यांची महाराष्ट्र विधिमंडळ रोजगार हमी योजना समितीच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. विधानसभा सचिव जितेंद्र भोळे यांच्या स्वाक्षरीने आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. सुनील शेळके यांच्या या नियुक्तीमुळे ग्रामीण भागातील रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मावळ विधानसभा क्षेत्रातून सलग दुसऱ्यांदा आमदार झालेले सुनील शेळके हे सामाजिक कार्यात सक्रीय असून मागील काही वर्षांपासून त्यांनी ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली रोजगार हमी योजनेत ठोस उपाययोजना व नवीन



### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन

» मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच इतर वरिष्ठ नेत्यांनी सुनील शेळके यांचे नियुक्तीबद्दल अभिनंदन केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

प्रकल्प राबविले जातील, असा विश्वास व्यक्त करीत नागरिकांनी निवडीचे स्वागत केले आहे.

निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना आमदार सुनील शेळके म्हणाले, 'ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना रोजगार मिळावा आणि त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हावे, यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून नव्या योजना आणण्याचा माझा मानस आहे.'

### रोजगार हमी योजना समिती

» समितीचे प्रमुख आमदार सुनील शेळके असून सदस्य म्हणून डॉ. संजय कुटे, डॉ. सुरेश खाडे, अमोल जावळे, विजयकुमार देशमुख, राजेश बकाने, हरिष पिंपळे, विनोद अग्रवाल, महेश चौघुले, राजेश वानखडे, विश्वनाथ भोईर, आमश्या पाडवी, शांताराम मोरे, हिकमत उढाण, काशिनाथ दाते, शंकर मांडेकर, संजय देरकर, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक आणि बापूसाहेब पठारे यांचा समितीत समावेश आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच इतर वरिष्ठ नेत्यांनी सुनील शेळके यांचे नियुक्तीबद्दल अभिनंदन केले आहे विधानसभा सचिव जितेंद्र भोळे यांच्या स्वाक्षरीने आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. सुनील शेळके यांच्या या नियुक्तीमुळे ग्रामीण भागातील रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली रोजगार हमी योजनेत ठोस उपाययोजना व नवीन प्रकल्प राबविले जातील, असा विश्वास व्यक्त करीत नागरिकांनी निवडीचे स्वागत केले आहे.

# पुरंदरचा वनविभाग कोठे? वनांना लागलेल्या आगीत फळबागांसह वनसंपदा होताहेत नष्ट

## पुरंदर तालुक्यात वनांना आगी लागण्याचे प्रमाण खूप वाढले आहे, वनांना लागलेल्या आगीत नैसर्गिक वनसंपदा मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात वनांना आगी लागण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. वनांना लागलेल्या आगीत नैसर्गिक वनसंपदा मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहेत. मोठमोठाली झाडे जळून पशुपक्षांची आश्रयस्थाने नष्ट होत आहेत. त्याचबरोबर शेतातील शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान होत आहे. त्यामळे पशुंपक्षी मित्र आणि शेतकरी टाहो फोडत आहेत. मात्र वनविभागाकडून अद्याप कोणत्याही उपाययोजना केल्याचे दिसून येत नसल्याने सर्वजण हतबल झाले आहेत. त्यामुळे पुरंदरचा वनविभाग कोठे आहे? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

मागील आठवड्यात दिवे, सोनोरी, वनपुरी, उदाचीवाडी, गुरोळी, सिंगापूर आदी गावांना समांतर असलेल्या डोंगराला दुपारच्या वेळी वणवा लागल्याचे दिसून आले. मात्र नंतर एवढा भडकला, संपूर्ण डोंगर जळून खाक झाले. सायंकाळच्या वेळी त्याची तीव्रता वाढतच राहिली. उदाचीवाडी गावातील नागरिकांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला मात्र त्याचा फारसा उपयोग झाला नाही. उदाचीवाडी येथील सुभाष मगर यांची आंब्याची आणि इतर कित्येक झाडे त्यामध्ये नष्ट झाली; परंतु वन विभागाने कोणतीही दखल घेतली नसल्याचे समोर आले आहे.



### वन संरक्षण समित्या फक्त सत्कारासाठी?

» गावोगावी वन संरक्षण समित्या स्थापन केल्या. मात्र या समित्या वर्षानुवर्षे केवळ कागदावरच राहिल्या असून समितीमधील पदाधिकारी ग्रामसभा, गावच्या कार्यक्रमात फक्त हार तुरे स्वीकारणे, लग्नपत्रिकेत नाव छापून सत्कार घेण्यात व्यस्त आहेत. स्थानिक गावातील नागरिकांना या समिती बद्दल फारसी माहिती दिली जात नाही. ग्रामपंचायत कारभारी त्यांच्या सोयीच्या व्यक्तींची नेमणूक करीत असल्याने केवळ एकमेकांची मर्जी राखण्यासाठी त्याचा उपयोग होत असल्याचे वनप्रेमींचे म्हणणे आहे.

आम्ही झाडकरी या सामाजिक संस्थेच्या मित्रांनी लावली होती याचे संगोपन देखील चांगले केले होते. झाडांना खते, कीडनाशके टाकुन त्याला ड्रीपद्वारे पाणी देण्याची व्यवस्था स्वखर्चाने केली होती. परंतु दोन-तीन दिवसांपूर्वी अज्ञात व्यक्तीने लावलेल्या आगीत सर्व झाडे जाळुन नष्ट झाल्याची माहिती मिलींद गुजर यांनी दिली आहे. ग्रामीण भागातील छोटे मोठे डोंगर या उन्हाळ्याच्या काही दिवसांत अक्षरशः जळून नष्ट झाला. मात्र वन विभागाने अद्यापपर्यंत एकही कारवाई केल्याचे दिसून आले नाही.

पदाधिकारी ग्रामसभा, गावच्या कार्यक्रमात फक्त हार तुरे स्वीकारणे, लग्नपत्रिकेत नाव छापून सत्कार घेण्यात व्यस्त आहेत. स्थानिक गावातील नागरिकांना या समिती बद्दल फारसी माहिती दिली जात नाही. ग्रामपंचायत कारभारी त्यांच्या सोयीच्या व्यक्तींची नेमणूक करीत असल्याने केवळ एकमेकांची मर्जी राखण्यासाठी त्याचा उपयोग होत असल्याचे वनप्रेमींचे म्हणणे आहे.

### सामाजिक वने वाचाविण्याबाबत वनविभाग उदासीन?

» पुरंदर तालुक्यातील किल्ले पुरंदरचा परिसर, चीव्हेवाडी घाट परिसर, सासवड जवळील वाघ डोंगर, काळदरी, पानवडी, ग्रामीण भागातील छोटे मोठे डोंगर या उन्हाळ्याच्या काही दिवसांत अक्षरशः जळून नष्ट झाला. मात्र वन विभागाने अद्यापपर्यंत एकही कारवाई केल्याचे दिसून आले नाही.

### साडे चारशे झाडे आगीत भस्मसात.

» सासवड येथील सोपान नगरच्या जवळ सुमारे साडेचारशे विवीध प्रकारची झाडे आम्ही झाडकरी या सामाजिक संस्थेच्या मित्रांनी लावली होती याचे संगोपन देखील चांगले केले होते. झाडांना खते, कीडनाशके टाकुन त्याला ड्रीप द्वारे पाणी देण्याची व्यवस्था स्वखर्चाने केली होती. परंतु दोन दिवसापूर्वी अज्ञात व्यक्तीने लावलेल्या आगीत सर्व झाडे जाळुन नष्ट झाल्याची माहिती आम्ही झाडकरी मित्र परिवारातील मिलींद गुजर यांनी दिली आहे. आंबा, जांभूळ अशा विविध प्रकारची झाडांच्या बिया आणुन त्यांचे संगोपन केले होते.

# बिबट्याने पशुधनावर हल्ला केल्यास पंचनाम्यासाठी कार्यालयात येवून अर्ज देण्याचा वनविभागाचा अजब निर्णय

## शिरुर तालुक्यातील ग्रामीण भागात बिबट्याच्या हल्ल्यांचं सत्र वाढतच आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील ग्रामीण भागात बिबट्याच्या हल्ल्यांचं सत्र वाढतच आहे. अशाच एका घटनेत सविंदणे गावात 26 मार्च रोजी पहाटे बिबट्याने शेतकऱ्याच्या पशुधनावर हल्ला करून त्याला ठार केलं. पण नुकसान भरपाईसाठी पंचनामा करण्यापूर्वी शेतकऱ्याला सविंदण्याहून थेट शिरूरच्या वनविभाग कार्यालयात अर्ज घेऊन येण्याचा अजब निर्णय वनविभागाने घेतला आहे. यामुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी आणि संताप पसरला आहे.



शेतकऱ्यांचा आक्रोश: "पंचनामा गावातच का नाही?"

पीडित शेतकऱ्यांचं म्हणणं आहे की, बिबट्याच्या हल्ल्यांमुळे आधीच आर्थिक नुकसान सोसावं लागतंय, त्यात आता पंचनाम्यासाठी शिरूरला जाण्यासाठी वेळ आणि पैसा खर्च करावा लागतोय. वनविभागाने गावातच येऊन पंचनामा करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी लावून धरली आहे. स्थानिकांनी प्रश्न उपस्थित केला आहे, "घटना गावात घडते, मग पंचनामा कार्यालयात का?" या नव्या जाचक नियमामुळे शेतकऱ्यांचं नुकसान आणि त्रास वाढला आहे. पंचनामा संबंधित शेतकऱ्याच्या गावातच येवून करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

बिबट्याचा धुमाकूळ, वनविभागाची उदासीनता-

शिरूर तालुका मोठा असून, काठापूर बु. (40 किमी), तांदळी (40 किमी), कोरेगाव भीमा (35 किमी) ही गावं शिरूरपासून दूर आहेत. या भागात बिबट्याने शेकडो पाळीव प्राणी ठार केले असून, लहान मुलांवर आणि माणसांवरही जीवघेणे हल्ले केले आहेत. यापूर्वी फोनवर माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी येऊन पंचनामा करत होते.

### शेतकऱ्यांची मागणी

» शेतकरी संघटनांनी वनविभागाला तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांमुळे आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यांना या नव्या नियमाने आणखी त्रास सहन करावा लागतोय. वनविभागाच्या या धोरणाविरोधात संतापाची लाट उसळली असून, याबाबत त्वरित बदल अपेक्षित आहेत.

### वनविभाग अधिकारी काय म्हणाले?

» वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे म्हणाले, "बिबट्याच्या हल्ल्यात पशुधन मृत्यूमुखी पडल्यास शेतकऱ्यांनी फक्त फोनवर माहिती देऊ नये, तर लेखी अर्ज कार्यालयात सादर करावा. अर्ज प्रत्यक्ष देणं शक्य नसल्यास ईमेल किंवा व्हॉट्सॲपवर पाठवावा. त्यानंतरच कर्मचारी पंचनाम्यासाठी येतील."